# विद्यार्थ्याला मिळाले तबब्ल ६४ लाखाचे पॅकेज

**म. टा. प्रतिनिधी, नागपूर**

इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) नागपूरच्या विद्यार्थ्याने आजवरच्या संस्थेतील इतिहासात सर्वाधिक ६४ लाखांचे वार्षिक पॅकज प्राप्त केले आहे. आयआयएमच्या सातव्या बॅचमधील एमबीएच्या विद्यार्थ्यांची प्लेसमेंट प्रक्रिया पूर्ण झाली असून दहा टक्के वाढीसह १६.७४ लाख सरासरी पॅकेज विद्यार्थ्यांना मिळाले आहे.

आयआयएम येथे झालेल्या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये जगातील टॉप-१०० कंपन्यांनी सहभाग घेतला होता. बुधवारी ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यात एका विद्यार्थ्याने ६४ लाख रुपयांच्या वार्षिक पॅकेज मिळविले. आजवरचे सर्वाधिक ४० लाखांचे पॅकेज २०१८-२०च्या बॅचमधील एका विद्यार्थ्याला मिळाले होते. २०१५ साली आयआयएम अहमदाबादच्या साहाय्याने नागपूर आयआयएमची सुरुवात करण्यात आली होती. तेव्हापासून आयआयएमच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी सुरू आहे. २०१६-१८ साली १९ लाख प्रतिवर्ष तर २०१७-१८ साली २० लाखांचे सर्वाधिक पॅकेज विद्यार्थ्यांनी

## 'कन्सल्टिंग'मध्ये अधिक रस!

विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या सरासरी पॅकेजमध्ये यंदा १० टक्के वाढ झाली आहे. २०२१-२३च्या बॅचसाठी सरासरी सीटीसी १६.७४ लाख रुपये प्राप्त झाले आहे. प्लेसमेंट झालेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ७० टक्क्यांची निवड आयटी आणि कन्सल्टिंग कंपन्यात झाली आहे. स्ट्रॅटेजी कन्सल्टंट, सेल्स ॲण्ड मार्केटिंग, प्रॉडक्ट मॅनेजमेंट यात विद्यार्थ्यांचा रस दिसून येतो आहे.



### आजवरचे सर्वोच्च

- २०२१-२३ : ६४ लाख
- २०२०-२२ : उघड नाही
- २०१९-२१ : उघड नाही
- २०१८-२० : ४० लाख
- २०१७-१९ : २० लाख
- २०१६-१८ : १९ लाख
- २०१५- १७ : उघड नाही